## शासकीय रोपवाटिकांची स्थापना व बळकटीकरण योजनेच्या मार्गदर्शक सूचना (सन २०१७-१८)

शासकीय रोपवाटिका बळकटीकरणाचे शासनाचे धोरण असून ज्या भागात फळबागा लागवडीस वाव आहे त्या भागातील शेतकऱ्यांना जवळच्या रोपवाटिकेवरुनच दर्जेदार कलमे-रोपे उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. अशा क्षेत्रात मागील ४-५ वर्षात फळपिकनिहाय लागवडीचा कल विचारात घेऊन, तसेच भविष्यात त्या फळपिकाखाली येणारे क्षेत्र यांचा विचार करुन रोपवाटिका विकासाचा आराखडा तयार करावा. आराखडा तयार करताना निवड केलेल्या रोपवाटिकेवर पायाभूत सुविधा उभारणे, आवश्यक असलेल्या मातृवृक्षांची लागवड करणे, रोपवाटिकांच्या संरक्षणासाठी सीमाभिंत बांधणे, पाण्याची सुविधा उपलब्ध करुन घेणे, पॉलीहाऊस, शेडनेट, हार्डनिंग शेड, ग्रीन हाऊस, इ. सुविधा तयार करण्यासाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध होणार आहे. रोपवाटिकांची निवड करुन आराखडे तयार करणेबाबत यापूर्वीच वेळोवेळी सूचना दिलेल्या आहेत. विकास कामे प्रस्तावित करताना हायटेक सुविधा उपलब्ध करुन घेण्याचा दृष्टीकोन समोर ठेवावा. राष्ट्रीय लिंबूवर्गीय फळपिक संशोधन केंद्र, नागपूर यांचेकडील रोपवाटिकांच्या धर्तीवर सुविधा तयार करण्यात याव्यात. संत्रावर्गीय पिकांच्या ट्रिस्टेझा विषाणू व सिट्रस ग्रिनींग बॅक्टेरीअम यांचा प्रसार रोखण्यासाठी, तसेच फायटोप्थोरामुक्त कलमे तयार करण्यासाठी एनआरसीसी,नागपूर यांचेकडील स्ट्रक्चर्स व सुविधाप्रमाणे शासकीय रोपवाटीकांवर सुविधा तयार कराव्यात.

राज्यात राबवण्यात येत असलेल्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेशी निगडीत फळबाग लागवड कार्यक्रमांतर्गत तसेच खुल्या विक्रीद्वारे शेतकऱ्यांना कलमा-रोपांचा पुरवठा करण्यात येतो. शेतक-यांना उत्कृष्ट वाणांच्या दर्जेदार लागवड साहित्याचा पुरवठा करणे, उच्च तंत्रज्ञानाचा वापर करुन प्रक्षेत्रे विकसित करणे, मातृवृक्षांची लागवड करणे, इत्यादी बाबींकरिता शासकीय रोपवाटिकेचे बळकटीकरण करणे या योजनेस मान्यता देण्यात आली आहे. सन २०१६-१७ मध्ये रोपवाटिकांवर शिल्लक असलेल्या कलमा / रोपांचा आढावा घेवुन तसेच महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे यांचे लक्षांक विचारात घेवून स्थानिक गरजेनुसार सन २०१७-१८ साठी कलमे/रोपे उत्पादन लक्षांक आपले स्तरावर निर्धारीत करण्यात यावा.

सन २०१७-१८ मध्ये राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत शासकीय रोपवाटिकांचे बळकटीकरणासाठी निधी मंजूर झाला असल्याने एकूण निर्धारीत भौतीक लक्ष्यांकापैकी राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत साध्य करावयाचा लक्षांक मिळालेल्या निधीच्या प्रमाणात स्वतंत्रपणे निश्चित करण्यात यावा..

लक्ष्यांक साध्य करण्यासाठी खालीलप्रमाणे घटकनिहाय कार्यवाही करण्यात यावी.

**१) रोपवाटिकावर अस्तित्वात असलेल्या मातृवृक्षामध्ये नविन व सुधारीत जातीच्या विविध फळझाडांच्या मातृवृक्षांची लागवड करणे** :- रोपवाटिकेवर सुधारीत व नविन वाणाच्या मातृवृक्ष बागांची लागवड करण्यात यावी. नविन फळपिकनिहाय मातृवृक्षाच्या लागवडीसाठी कृषि विद्यापीठाच्या रोपवाटिकांवरुन कलमे-रोपे उपलब्ध करुन घेऊन लागवड करावी. तसेच लिंबुवर्गीय फळपिकांचे बाबतीत राष्ट्रीय लिंबूवर्गीय फळसंशोधन केंद्र,नागपूर यांचेशी संपर्क साधून लागवड साहित्य प्राप्त करुन घ्यावे. विशेषत: नवीन मातृवृक्षाची लागवड करतांना शिफारस केलेल्या वाणांची लागवड करावी. संत्रा, मोसंबी, पेरु, डाळींब- भगवा, डाळींब- फुले सुपर भगवा, आंबा-केशर, त्याचप्रमाणे इतर मागणी असलेल्या (चिंच, आवळा) फळपिकांच्या वाणांची लागवड करण्यात यावी. याशिवाय रोपवाटिकांवर **जंबेरी, रंगपूर लाईम**, खिरणी या मूळकांडाची कमतरता भासू नये यासाठी पुरेशी मातृवृक्ष लागवड करण्यात यावी.

**२) रोपवाटिकेवर उपलब्ध सिंचन क्षमतेत वाढ करणे** - रोपवाटिकेवर सिंचनाचे नविन स्त्रोत निर्माण करणे, उपसा जलसिंचन योजना, नविन विहीरी घेणे, जुन्या विहीरीतील गाळ काढणे व बांधणे, खोल करणे, बोअर घेणे,

पाईपलाईन टाकणे, प्लास्टिक अस्तरीकरणाचे शेततळे, पाण्याच्या टाक्या बांधणे, ठिबक व तुषार सिंचन संच बसविणे, इलेक्ट्रिक मोटार बसविणे इत्यादी कामे घेता येतील. तसेच अस्तित्वात असलेल्या नादुरुस्त सिंचन सुविधा दुरुस्त करुन कार्यक्षमता वाढविण्यात यावी. रोपवाटिकेवरील १०० टक्के मातृवृक्ष ठिबक सिंचनाखाली आणणे, विहीर पुर्नभरण कार्यक्रम राबविण्यासंदर्भातही उपक्रम घेण्यात यावेत.

**३) रोपवाटिकेवर उच्च तंत्रज्ञानावर आधारीत पॉलीहाऊस, शेडनेट, हार्डनिंग शेड, इ. सुविधा निर्माण करणे व दुरुस्त करणे:-कलमे/रोपे** उत्पादनासाठी प्रपोगेशन हाऊस, हार्डनिंग शेड, पॉटिंग शेड, माती निर्जंतूकीकरण प्लॅटफॉर्म, पॉलीटनेल्स, हरितगृह, शेडनेट, ग्रीन हाऊस या सारख्या सुविधांची आवश्यकतेप्रमाणे कामे घेण्यात यावीत. लिंबूवर्गीय फळपिकांच्या विषाणूजन्य ट्रिस्टेझा व ग्रिनींग बॅक्टेरियम या रोगांचा प्रसार रोखण्याच्या उद्देशाने रोगमुक्त कलमे तयार करण्यासाठी एनआरसीसी,नागपूर येथील रोपवाटीकेप्रमाणे स्ट्रक्चर्स उभारण्यात यावीत. मावा व सिट्रस सायला या व्हेक्टर्सपासून संरक्षित ठेवण्यासाठी नेट हाऊस घेण्यात यावेत. फायटोफ्थोरासाठी एनआरसीसी,नागपूर यांचेकडील तंत्रज्ञानाप्रमाणे सुविधा तयार करुन त्याद्वारे कलमे उत्पादन करावीत. याशिवाय ट्रायकोडर्मा, एनपीव्ही, इत्यादींचे उत्पादनासाठी पायाभूत सुविधा निर्माण कराव्यात. अस्तित्वात असलेल्या तांत्रीक सुविधांचाही प्रभावीपणे वापर करणेसाठी त्यांची दुरुस्ती करुन कार्यक्षमता वाढवावी.

**४) रोपवाटिकेवर पॉवरस्प्रेअर, डस्टर, फॉगर्स, ट्रॅक्टर्स, पॉवरटिलर, सौर उर्जेवर आधारीत यंत्रे / उपकरणे इ. यांत्रीक सुविधात वाढ करणे व दुरुस्त करणे** - रोपवाटिकेवर पॉवर स्प्रेअर, डस्टर, फॉगर्स, गवत कापणी यंत्र, ट्रॅक्टर्स, पॉवर टिलर, ट्रॅक्टरची औजारे तसेच सौर उर्जेवर आधारीत यंत्रे / उपकरणे व त्यांची दुरुस्ती यासारख्या बाबी या अंतर्गत घेता येतील.

**५) शासकीय रोपवटिकेवर किरकोळ स्वरुपाची विकास कामे व त्यांची दुरुस्ती करणे** - राज्यात रोपवटिकांवर सिमेंट प्लॅटफार्म, सिमेंट बेड, पॉटिंग शेड, इंम्लीमेंट शेड, स्टोअर शेड, गांडूळखत उत्पादन युनिट, बायोडायनॅमिक कंपोस्ट युनिट, सिमाभिंत, अंतर्गत रस्ते, इ. काम आवश्यकतेनुसार करावी.

वरीलप्रमाणे शासकीय रोपवाटिकांचे बळकटीकरण करण्यासाठी आवश्यक त्या सोयीसुविधा निर्माण कराव्यात.

रोपवाटिकांवर घ्यावयाच्या विकास कामांचा प्राधान्यक्रम ठरवून त्यानुसार कामे करावीत. **रोपवाटिकेवरील विकास कामांना मंजूरी देताना सदरच्या विकास कामांचा संबंध फळरोपवाटिकेवरील उत्पन्न वाढीसाठी राहील अशा विकास कामांना प्राधान्याने मान्यता देण्यात यावी.** नाला बंडींग घेणे, शेततळे खोदणे, नाला सरळीकरण, जमीन सपाटीकरण,इ.मृदसंधारणादी विविध कामे शासकिय योजनांतर्गत करुन घ्यावीत. त्यासाठी रोपवाटिका बळकटिकरण योजनेतून खर्च करु नये. संरक्षक कुंपणाची कामे पूर्ण करुन घ्यावीत. रस्ता डांबरीकरण, प्रवेशद्वार, विविध बांधकामे यास मंजूरी देताना रोपवाटिका आर्थिक दृष्टया सक्षम आहे याचा विचार करावा.ज्या रोपवाटिका तोट्यात आहेत तेथे अनुत्पादक कामांना मान्यता देण्यात येऊ नये.

**६) कलमे रोपे उत्पादनाशी निगडीत अनुषंगिक बाबी** :- या योजनेअंतर्गत मजूरी, सामुग्री या घटकासाठी आणि कलमे, रोपे उत्पादनसंबंधी अनुषंगीक व आकस्मीक खर्च भागविणेसाठी, तसेच परिरक्षण-देखभाल, दुरुस्ती, इ. कामासाठी निधी खर्च करता येईल. विहीरीवरील अथवा उपसा सिंचन योजनेवरील पाणीपुरवठ्याच्या **विद्युत मोटारींची वीजदेयके** आणि पाटबंधारे विभागाकडील पाणी वापरत असल्यास त्यांची **पाणीपट्टीची** देयके **सामुग्री पुरवठा** या बाबीखाली उपलब्ध असलेल्या तरतूदीतून खर्ची टाकण्यात यावेत. कलमां-रोपांच्या वाढीसाठी आवश्यक असणारे सामुग्री उदा. पॉटिंग मिश्रण, रासायनिक खते व सेंद्रीयखत, कीटकनाशके, बुरशीनाशके, संजीवके, मुळकांडे बियाणे, डोळेकाड्या खरेदीसाठीचा खर्च, इत्यादिसाठी सामुग्री अंतर्गत उपलब्ध तरतूदीचा वापर करावा. सामुग्रीची खरेदी करताना फलोत्पादन विभागाच्या रोपवाटिका तांत्रिक व प्रशासकिय कार्यपध्दती पुस्तिकेत नमूद केलेल्या मापदंडाचा वापर करावा. त्याचप्रमाणे मजूरी या बाबीवर खर्च करताना रोपवाटिकेवर उत्पादित होणा-या कलमा,रोपांची संख्या विचारात घेणे आवश्यक आहे.

७) **मातृवृक्ष व कलमे/रोपे गुणवत्तावाढ कार्यक्रम राबविणे:** रोपवाटिकांवरील कलमे-रोपे यांच्या संख्यात्मक वाढीबरोबरच लागवडी योग्य कलमांचाच पुरवठा होणे महत्वाचे आहे. कलमे-रोपे पुरवठा करताना विहीत प्रमाणकानुसार कलमे/रोपे विक्रीसाठी उपलब्ध करावीत. या प्रमाणकात कलमारोपांच्या खोडाची जाडी, वाढ, कलमीकरण जोडाची जमीनीपासूनची उंची व कलमा/रोपांचे वय, वापरलेले मूळकांड शिफारसीत आहे अगर कसे, इत्यादी बाबींचा समावेश आहे. रोपवाटिकेतून पुरविण्यात येणारी कलमे रोगमुक्त असण्यासाठी मातृवृक्ष कीड व रोगमुक्त असणे महत्वाचे आहे. विशेषकरुन लिंबूवर्गीय फळपिकात फायटोप्थोरामुक्त मातृवृक्ष असणे किंवा डाळींब पिकात तेलकट डाग मुक्त मातृवृक्ष असणे अनिवार्य आहे. तसेच प्रत्येक फळपिकाचे बाबतीत विचार करुन रोपवाटिकेतून रोगसंक्रमीत कलमे/रोपे शेतक-यांना वाटप होणार नाहीत याची सर्वतोपरी दक्षता घ्यावी. मूळकांडांसाठीचे पुरेशे बियाणे रोपवाटीकेवरच मिळण्यासाठी पुरेशा रंगपूर लाईम व जंबेरीच्या मातृवृक्षांची लागवड करावी. कोकण विभागातील रोपवाटीकेवर खिरणीची रोपे मोठ्या प्रमाणात तयार करावी. डाळींबामध्ये तेलकट डाग रोगावर कृषि विद्यापीठांनी शिफारस केलेल्या उपाययोजनांचा अवलंब करावा. रोपवाटिकेतून पॉटिंग मिश्रणातून मर (फ्युर्जेरियम.इ.), सूत्रकृमी (निमॅटोड), इत्यादी कलमा/रोपां बरोबर शेतक-यांच्या शेतावर जाऊ नये यासाठी योग्य प्रमाणात पॉटिंग मिश्रण (खत, माती व वाळू यांचे मिश्रण) तयार करुन त्याचे **निर्जंतूकीकरण** करावे.

शासकीय रोपवाटिकांचे बळकटीकरण करणे या योजनेतील कामांचे पुरेशा गांभीर्याने नियोजन करण्यात यावे व या योजनेअंतर्गत २०१७-१८ मध्ये कलमे/रोपे उत्पादन व विकास कामे यासाठी उपलब्ध होणारा निधी पूर्ण खर्च करण्याची दक्षता घ्यावी. तसेच राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत उपलब्ध करून दिलेल्या निधीचे लेखे स्वतंत्रपणे ठेवण्यात यावेत. व प्रकल्प पूर्ण होताच त्याची यशस्वीता या कार्यालयास कळवावी.

**वरील बाबी राबविण्यासाठी सक्षम अधिका-याची मान्यता घेऊन कार्यवाही करावी. कार्यावाही करताना विहीत वित्तिय अधिकार व लेखा पध्दतीचा अवलंब करण्यांत यावा. मात्र कामे करत असताना कामाचा दर्जा/खरेदी करण्यात येणाऱ्या वस्तूंचा दर्जा यामध्ये कोणत्याही प्रकारची तडजोड करण्यात येवू नये. त्याचप्रमाणे रोपवाटीकेवरील कामांची सविस्तर अंदाजपत्रके सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंत्यांकडून, तसेच कृषि विद्यापिठ, जिल्हापरिषद बांधकाम विभाग, लघुपाटबंधारे विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, इ. शासकीय विभागांकडून प्राप्त करुन घ्यावीत व अशा प्राप्त झालेल्या सविस्तर अंदाजपत्रकांस प्रशासकीय व तांत्रिक मंजूरीबाबत विहीत पध्दतीने कार्यवाही करावी.**

मार्गदर्शक सूचनेप्रमाणे **गौण बांधकामांचे रोपवाटीकानिहाय, कामनिहाय, जिल्हानिहाय नियोजन १५ दिवसांत पूर्ण करुन आयुक्तालयास सादर करावे.** योजनेचा आर्थिक व भौतिक प्रगती अहवाल दरमहा ५ तारखेपर्यंत आयुक्तालयास सादर करावा.

संचालक, फलोत्पादन
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५.

---

जाक्र.कृआ/फलो-२न/रोवाबमासु/१७-१८ / १७१६/२०१७.
कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे-५.
दिनांक - २० जुलै २०१७

प्रति,

१. विभागीय कृषि सहसंचालक, (सर्व)----------

२. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, (सर्व)-------

| अ.क्र. | जिल्हा | राष्ट्रीय कृषि विकास योजना २०१७-१८ साठी मागणी रु. लाख | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मागणी (रु. लाखात) | | | | | वाटप (रु. लाखात) | | | |
| | | गोण बांधकामे | एकुण | सामुग्री पुरवठा | मातृवृक्ष लागवड | एकुण मागणी | गोण बांधकामे | सामुग्री पुरवठा | मातृवृक्ष लागवड | एकुण वाटप |
| १ | ठाणे | ०.०० | ३०.०० | १.०० | ०.५० | १.५० | ०.०० | १.०० | ०.२५ | **१.२५** |
| २ | पालघर | ०.०० | १२३.०० | २.४० | २.०० | ४.४० | ०.०० | २.४० | १.०० | **३.४०** |
| ३ | रायगड | ६.०० | २३६.०२ | ४.०८ | ४.८३ | १४.९१ | १.७० | ४.०८ | २.४२ | **८.२०** |
| ४ | रत्नागिरी | ४४.५० | १७९.४३ | ८.६० | ३.८३ | ५६.९३ | १२.०० | ८.६० | १.९० | **२२.५०** |
| ५ | सिंधुदुर्ग | २१.०० | ६८.३४ | ०.०० | ३.८६ | २४.८६ | ६.०० | ०.०० | १.९० | **७.९०** |
| **कोकण विभाग** | | **७१.५०** | **६३६.७९** | **१६.०८** | **१५.०२** | **१०२.६०** | **१९.७०** | **१६.०८** | **७.४७** | **४३.२५** |
| ६ | नाशिक | २१.०० | ६१.८० | ५.२१ | ७.०४ | ३३.२५ | ६.०० | ५.२१ | ३.४९ | **१४.७०** |
| ७ | धुळे | ०.०० | १२५.०० | ३.६० | २.५० | ६.१० | ०.०० | ३.६० | १.२५ | **४.८५** |
| ८ | नंदुरबार | ०.०० | ०.०० | ४.७१ | ०.०० | ४.७१ | ०.०० | ४.७१ | ०.०० | **४.७१** |
| ९ | **जळगाव** | **१३.५३** | **३३.३६** | **०.८०** | **११.३५** | **२५.६८** | **३.२०** | **०.८०** | **५.६८** | **९.६८** |
| नाशिक विभाग | | **३४.५३** | **२२०.१६** | **१४.३२** | **२०.८९** | **६९.७४** | **९.२०** | **१४.३२** | **१०.४२** | **३३.९४** |
| १० | अहमदनगर | १२.२० | ६७.२० | १.८० | ३.७१ | १७.७१ | ३.५० | १.८० | १.८५ | **७.१५** |
| ११ | पुणे | **१७.२०** | **४४३.००** | ३.११ | ४.८० | २५.११ | **४.५०** | ३.११ | २.४० | **१०.०१** |
| १२ | सोलापुर | ०.३६ | ०.३६ | ०.०५ | ०.९५ | १.३६ | ०.१० | ०.०५ | ०.४५ | **०.६०** |
| **पुणे विभाग** | | **२९.७६** | **५१०.५६** | **४.९६** | **९.४६** | **४४.१८** | **८.१०** | **४.९६** | **४.७०** | **१७.७७** |
| १३ | सातारा | ०.०० | २१.०० | २.०० | ०.७० | २.७० | ०.०० | २.०० | ०.३५ | **२.३५** |
| **१४** | **सांगली** | **०.००** | **२०.००** | **२.८०** | ०.०० | **२.८०** | **०.००** | **२.८०** | ०.०० | **२.८०** |
| १५ | कोल्हापुर | ०.०० | २७.०० | २.३० | ०.५० | २.८० | ०.०० | २.३० | ०.२५ | **२.५५** |
| **कोल्हापुर विभाग** | | **०.००** | **६८.००** | **७.१०** | **१.२०** | **८.३०** | **०.००** | **७.१०** | **०.६०** | **७.७०** |
| १६ | औरंगाबाद | ११.७० | ५७.७० | ०.६० | २.९५ | १५.२५ | ३.१० | ०.६० | १.४८ | **५.१८** |
| १७ | जालना | ०.०० | **१०.००** | ०.४० | ०.१० | ०.५० | ०.०० | ०.४० | ०.०५ | **०.४५** |
| १८ | बीड | ५.०० | २३०.०० | ११.०० | २०.९५ | ३६.९५ | १.५३ | ११.०० | १०.४८ | **२३.०१** |
| **औरंगाबाद विभाग** | | **१६.७०** | **२९७.७०** | **१२.००** | **२४.००** | **५२.७०** | **४.६३** | **१२.००** | **१२.००** | **२८.६३** |
| १९ | लातूर | ०.०० | १०.०० | ०.५० | ३.०० | ३.५० | ०.०० | ०.५० | १.५० | **२.००** |
| २० | उस्मानाबाद | १७.०० | ३२.०० | १.४० | १०.२५ | २८.६५ | ४.५० | १.४० | ५.०९ | **१०.९९** |
| २१ | नांदेड | १०.०० | १२०.०० | १.५८ | ६.९५ | १८.५३ | २.८५ | १.५८ | ३.४७ | **७.९०** |
| २२ | परभणी | २०.०० | ८०.०० | ४.०० | १०.०० | ३४.०० | ५.७० | ४.०० | ५.०० | **१४.७०** |
| २३ | हिंगोली | ३०.४० | ४५.९० | १.९२ | १४.०० | ४६.३२ | ८.६८ | १.९२ | ७.०० | **१७.६०** |
| **लातुर विभाग** | | **७७.४०** | **२८७.९०** | **९.४०** | **४४.२०** | **१३१.००** | **२१.७३** | **९.४०** | **२२.०६** | **५३.१९** |
| २४ | बुलढाणा | ०.०० | ०.०० | २.७६ | ११.०० | १३.७६ | ०.०० | २.७६ | ५.४९ | **८.२५** |
| २५ | वाशिम | १०.२८ | ३६.७८ | ०.०० | ०.०० | १०.२८ | २.५७ | ०.०० | ०.०० | **२.५७** |
| २६ | अकोला | १०.०० | २३.५० | २.०० | १.४० | १३.४० | २.५० | २.०० | ०.७० | **५.२०** |
| २७ | अमरावती | ०.०० | ७३.०० | ०.२२ | ०.७७ | ०.९९ | ०.०० | ०.२२ | ०.३८ | **०.६०** |
| २८ | यवतमाळ | २३.०० | ८८.०० | २.४२ | २.९६ | २८.३८ | ५.०० | २.४२ | १.४८ | **८.९०** |
| **अमरावती विभाग** | | **४३.२८** | **२२१.२८** | **७.४०** | **१६.१३** | **६६.८१** | **१०.०७** | **७.४०** | **८.०५** | **२५.५२** |
| २९ | वर्धा | ३.५० | ४२.५० | ३.३५ | ५.८५ | १२.७० | ०.८८ | ३.३५ | २.९३ | **७.१५** |
| ३० | नागपूर | २१.०० | ८६.७० | ५.५८ | ४.४२ | ३१.०० | ५.२१ | ५.५८ | २.२१ | **१३.००** |
| ३१ | भंडारा | ०.०० | ५२.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | **०.००** |
| ३२ | गोंदिया | १.५० | १.५० | ०.५० | ०.३० | २.३० | ०.३५ | ०.५० | ०.१५ | **१.००** |
| ३३ | चंद्रपूर | ४.५० | ५९.८० | १.१६ | ०.०० | ५.६६ | १.१० | १.१६ | ०.०० | **२.२६** |
| ३४ | गडचिरोली | ०.८० | ४३.४३ | १.९० | १.०० | ३.७० | ०.२० | १.९० | ०.५० | **२.६०** |
| **नागपुर विभाग** | | **३१.३०** | **२८५.९३** | **१२.४९** | **११.५७** | **५५.३६** | **७.७४** | **१२.४९** | **५.७९** | **२६.०१** |
| **एकूण** | | ३०४.४७ | २५२८.३२ | ८३.७६ | १४२.४७ | ५३०.७० | ८१.१७ | ८३.७६ | ७१.०८ | २३६.०० |

संचालक, फलोत्पादन
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे ५